'Effective Communication to Positivity'

**"सुसंवादातुन सकारात्मकतेकडे"**

**वेबिनार अहवाल.**

भारतीय विद्या भवन्सचे सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने टेक्यूप -३ अंतर्गत शुक्रवार दिनांक **३० ऑक्टोबर** 2020 रोजी सायंकाळी चार ते साडे सहा या वेळेत सुसंवादातुन सकारात्मकतेकडे ह्या विषयावर राज्य पातळीवर ऑनलाइन वेबिनार आयोजित करण्यात आले होते.ह्या कार्यक्रमाची सुरुवात वेबिनार चे आयोजक श्री. लुईस डायस यांनी छोट्या प्रस्तावनेने केली तदनंतर यांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख व ह्या कार्यशाळेचे को-ऑर्डिनेटर डॉ. सुधाकर उमाळे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून वक्तयाची ओळख करून दिली. तदनंतर संस्थेचे प्रभारी प्राचार्य डॉ.मोहन मुरडी सर यांनी औपचारिक रित्या वेबिनार चे उद्घाटन केले व कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. तद्नंतर रीतसर वेबिनारची सुरुवात करण्यात आली. ह्या वेबिनार साठी **डॉ.नितीन देशपांडे सर (लीड कन्सल्टंट ज्ञानपीठ अकडमी पुणे)** वक्ते म्हणून लाभलेले होते.




आपणास ठाऊक आहे की सध्या करोना विषाणूच्या महामारी मुळे जगावर फार मोठे संकट आलेले आहे. त्यामुळे आपण सर्वजण त्रस्त झालेला आहोत, भयभीत झालेला आहोत, चिंताग्रस्त झालेलो आहोत. आपल्यावर आलेले हे महाभयानक संकट कधी एकदा टळून जाईल याची आपण वाट पाहत आहोत,गेलेल्या सात महिन्यांपासून जास्त काळ आपण ह्या संकटाचा सामना करीत आहोत.काही अंशी आपण घरातच अडकुन आहोत त्यामुळे आपला एकमेकाबरोबरचा सुसंवाद बंद झाल्यामुळे आपण नकारात्मकते म्हणजेच नैराश्य आल्यासारखे वागत आहोत. कुटुंबातील सदस्य,आजूबाजूच्या सहकार्या बरोबर सुसंवाद न झाल्यामुळे आपले नाते जणू तुटल्यासारखे आपणास भासत आहेत. आपणास एकमेका बरोबरचा सुसंवाद वाढविण्यासाठी आपल्या मधील नकारात्मक अशी भावना नाहीशी करून हा सुसंवाद आपल्या कुटुंबात, आजूबाजूच्या परिसरात, समाजात अथवा आपल्या कामाच्या ठिकाणी कसा वाढवता येईल याविषयी डॉ. नितीन देशपांडे सर यांनी ह्या वेबिनार मध्ये बहुमोल असे मार्गदर्शन केले. सर म्हणाले कि माणूस आपल्या भाषेमध्ये जन्म घेतो त्यामुळे माणसाचे विचार त्यांच्या जन्मातूनच येत असतात जेव्हा दोन व्यक्तींमध्ये संभाषण होते तेव्हा सुसंवाद साधला जातो. विसंवाद हा कुटुंबात होत असतो. सकारात्मकता म्हणजे आपला आत्मविश्वास वाढला पाहिजे. आपल्यात आत्मविश्वासाचा अभाव असल्यास सकारात्मकता येत नाही. एक वेळ आपल्यात मतभेद चालतील पण मनभेद नकोच नको अशा निरनिराळ्या उदाहरणाद्वारे सरांनी आजच्या विषयाची संकल्पना समजावून सांगितली.

ह्या कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून १०० व्यक्तीने सहभाग दर्शविला होता. कार्यक्रमांमध्ये विचारलेल्या प्रश्नांना डॉ.नितीन देशपांडे सरांनी उत्तर देऊन शंकेचे समाधान केले. कार्यक्रमानंतर उपस्थितां कडून फीडबॅक फॉर्म ऑनलाईन भरून घेऊन तद्नंतर त्यांना सर्टिफिकेट पाठवण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी समन्वयक डॉ.सुधाकर उमाळे सरांनी सर्वांचे आभार मानले तसेच आयोजक श्री.लुईस डायस ह्यांनी सर्वप्रथम कॉलेजचे प्रभारी प्राचार्य श्री मोहन मुरूडीसर यांनी वेबिनार आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानले.टेक्यूप -३ चे कॉर्डिनेटर श्री.राहूल दहातोंडे सर ह्यांनी टेक्यूप अंतर्गत हा वेबिनार आयोजित करण्यासाठी संधी दिली त्याबद्दल त्यांचे देखील आभार मानण्यात आले.तसेच को ऑडिनेटर डॉ.सुधाकर उमाळे सर ह्यांनी केलेल्या सहकार्य बद्दल त्यांचे आभार मानले. त्याचबरोबर महाराष्ट्र मधून निरनिराळ्या कॉलेजमधून, इंडस्ट्रीमधून ज्यांनी हया वेबिनार मध्ये सहभाग घेतला त्यासर्व सहभागी व्यक्तीचे आभार मानण्यात आले.

धन्यवाद.